# चर्चिलचे फसलेले अपहरण

मोहनतारा पाटील

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**चर्चिलचे फसलेले अपहरण**
मोहनतारा पाटील

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मोहनतारा पाटील

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २५०/-

# चार शब्द

मध्यरात्र उलटून बरोबर एक तास झाला होता. अंधार आसमंत व्यापून राहिला होता. थंडगार वारे काळोखाला कापरं भरवीत होते. साऱ्या जगावरच दुसऱ्या महायुद्धानं भीषण अवकळेचं पांघरूण घातलं होतं. भवितव्याची भेडसावणारी भयाण स्वप्नं पाहात जग जरी झोपी गेलं असलं तरी जर्मन पोलीसप्रमुख राईश फ्युरर हेन्रीच हिमलर आपल्या ऑफिसात अस्वस्थपणे फेऱ्या घालीत होता... शनिवार, ६ नोव्हेंबर १९४३. तो अधीरतेनं कशाची तरी प्रतीक्षा करीत होता. अनावर झालेली उत्सुकता गंभीरतेचा मुखवटा धारण केलेल्या त्याच्या चेहऱ्यावर जरी प्रतीत होत नव्हती तरी अस्वस्थपणे चाललेल्या त्याच्या फेऱ्यांतून ती प्रकट होत होती. जग जिंकायला निघालेल्या जर्मनीच्या अन् अर्ध्या जगाच्या सर्वसत्ताधीशानं–हिटलरनं त्याच्यावर सोपवलेली अतिशय अवघड अन् अशक्यप्राय वाटणारी कामगिरी हेच त्याच्या अस्वस्थतेमागचं कारण होतं. ही कामगिरी यशस्वी झाली तर पराजयाकडं झुकणारं जर्मनीचं पारडं विजयाकडं झुकणार होतं, एवढंच नव्हे तर हिटलरच्या मनात हिमलरचं स्थान आणखीनच उंचावणार होतं, ती कामगिरीच तशी लोकविलक्षण होती, अद्‌भुत होती अन् अद्वितीयदेखील होती. तरल कल्पनाशक्ती असलेल्या राजकारणी मुत्सद्द्याच्या स्वप्नातदेखील येणार नाही अशी योजना सत्यात उतरवू पाहण्याची महत्त्वाकांक्षा हिमलरनं मनाशी बाळगली होती. ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नव्हता अशा सर्वसमर्थ ब्रिटिश राजसत्तेच्या प्रत्यक्ष पंतप्रधानालाच पळवून आणण्याचा तो एक महाभयंकर, कुटिल कट हिमलरनं आखला होता...

...हिमलरच्या ऑफिसातला फोन खणखणला अन् त्यानं अत्यंत त्वरेनं जाऊन तो उचलला. त्यातून येणारे शब्द कानावर पडताच त्याचा चेहरा आनंदानं उजळून निघाला. परवलीच्या त्या शब्दांतून हिमलरला मात्र फार मोठा अर्थ उमगला, 'युद्धाच्या धकाधकीतून दोन दिवस विश्रांती घेण्यासाठी नॉरफोकच्या राजकीय विश्रामगृहात उतरलेल्या ब्रिटिश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना पळवून

आणण्यासाठी गेलेले जर्मन गुप्तहेर, विमानातून पॅरॅशूटच्या साहाय्यानं ब्रिटिश भूमीवर सुखरूपपणे उतरले होते.'

नवी पिढी आजकाल दिशाहीन होत चालली आहे. तरुण मनाला भविष्यात काय वाढून ठेवलं आहे याची चिंता सतत जाळत असते. मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढत जाणारी महागाई, बेबंदपणे पसरत जाणारी बेकारी अन् भवितव्याला भेडसावणारी अनिश्चितता यामुळं कोवळी मनं वैफल्यग्रस्त बनत चालली आहेत. अशा वेळी आवश्यकता असते आदर्श व्यक्तिमत्त्वांची, खवळलेल्या समुद्रात भरकटलेल्या नावेचं सुकाणू सांभाळणाऱ्याची, अंधारलेल्या वाटेवर प्रकाशाचा किरण दाखविणाऱ्याची. अशा आदर्श व्यक्ती आजकाल आढळतात तरी कोठे? अन् आढळल्याच तर त्या कोठेतरी कथा-कादंबऱ्यात वा नाटक-सिनेमात; पण बहुतांशी हा तर सारा कल्पनाविलासच असतो. अशा वेळी यासारखी सत्य घटनेवर आधारलेली एखादी कादंबरी स्टायनरसारख्या आगळ्यावेगळ्या, तेजस्वी अन् धीरोदात्त व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडविते अन् धास्तावलेल्या मनाला दिलासा मिळतो.

अशा आदर्श व्यक्ती या कोणत्याही एखाद्याच देशाच्या, धर्माच्या, वंशाच्या वा वर्णाच्या असत नाहीत. बंधनातीत असणारी अशी महान व्यक्तिमत्त्वं ही साऱ्यांनाच आपलीशी वाटतात. या कादंबरीचा नायक आहे स्टायनर. व्यवहाराची फूटपट्टी लावली असता स्टायनर हा खलनायकच ठरतो. जगाचा विध्वंस करायला निघालेल्या हिटलरसारख्या क्रूरकर्म्यासाठी, दुर्बलांचं रक्षण करण्यासाठी उभ्या ठाकलेल्या इंग्लंडच्या पंतप्रधानाचं अपहरण करणं हे कृत्य खरं म्हणजे खलनायकाला शोभेसंच आहे. पण जाज्वल्य देशभक्ती, कडवी स्वामिनिष्ठा अन् असीम धाडस या गुणांमुळं हाच खलनायक प्रभावशाली नायक बनून जातो.

मृत्यू भल्याभल्यांना भयभीत करून सोडतो. मी मी म्हणणाऱ्यांचा थरकाप उडवितो असं म्हणतात. पण मृत्यू समोर उभा असूनही, चर्चमधील शत्रुपक्षाच्या सर्वसामान्य नागरिकांना सोडून देण्याचा हुकूम, धोका पत्करूनही स्टायनर देतो तेव्हा त्याचं हे कृत्य अमेरिकन सैनिकांचा कॅप्टन हॅरी केन याला विस्मयचकित करून टाकतं. एवढंच नव्हे तर तो मनातल्या मनात स्टायनरपुढं नतमस्तक होऊन जातो. या साहसनाट्याच्या अखेरीस पंतप्रधानांच्या तोंडूनही अपहरण करण्यासाठी आलेल्या स्टायनरविषयी 'शूर सैनिक अन् महान माणूस' असे गौरवोद्गार निघतात.

स्टायनर धैर्याचा मेरूमणी आहे तसाच तो माणुसकीचा मुकुटमणीदेखील आहे. नाझी राजवटीत एका ज्यू पोरीला वाचविण्याची किंमत त्याला माहीत नव्हती असं नाही. जिवावरचा धोका पत्करूनही तिला वाचवण्याचं धाडस दाखवताना गेस्टापोच्या जनरलच्या रोषाची क्षिती तो बाळगत नाही. निरपराध गावकऱ्यांना ओलीस धरून पळून जाण्याची संधी आलेली असतानाही ती निर्भयपणे नाकारण्याचं धाडस त्याच्यात आहे. जीवनमृत्यूच्या सीमारेषेवर देहांत शासनाची बेदरकारपणे वाट पाहात असलेल्या स्टायनरला सोडवून नेण्यासाठी कॅप्टन रॅडल जेव्हा येतो तेव्हा त्या जेलचा प्रमुख कॅप्टन न्यू ऑफ त्याला म्हणतो, 'जा, जरूर घेऊन जा स्टायनरला. स्टायनरसारखी माणसं जिवंत राहिल्यानं जर्मनीचा जितका फायदा होईल तितका त्याच्या मृत्यूनं होणार नाही.' अशी ही असामान्य व्यक्तिरेखा मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याचं काम लेखिकेनं अत्यंत समर्थपणे केलं आहे.

जर्मन सैनिक म्हणजे क्रूर, कडवे, कठोर, अमानुष अन् राक्षसी अशी इंग्लंडमधील त्या खेड्यातील रहिवाशांची कल्पना. तशी ती कल्पना त्यांचीच नव्हे तर साऱ्या जगाची होती अन् आहे. अर्थात ती खोटी आहे असं कोणी म्हणणार नाही. पण त्यालाही अपवाद असतात. अन् या अपवादांमुळंच अखेरीस वाईटाचा पराभव अन् चांगल्याचा विजय होऊ शकतो. रावणाच्या घरात राहूनही बिभीषण अन् धृतराष्ट्राच्या छायेत वावरूनही विदुर चांगले विचार करू शकतात हे कशाचं द्योतक आहे? म्हणूनच असेल कदाचित, पंतप्रधानाच्या छातीवर पिस्तूल रोखून उभ्या असलेल्या स्टायनरचा हात चाप ओढण्यास क्षणभर कचरला. स्टायनरच्या हृदयातही कोठेतरी माणुसकीचा झरा वाहत असणार हेच या गोष्टीवरून दिसून येतं. स्टायनर आणि त्याचे साथीदार हे तर सारे इंग्लंडचे साक्षात शत्रू. पण इंग्लंडमधल्या ज्या गावात ही माणसं पंतप्रधानांच्या अपहरणासाठी उतरतात, त्याच गावात अखेरीस त्यांचं स्मारक उभं केलं जातं, तेही तेथील गावकऱ्यांकडून. शत्रूलासुद्धा प्रिय ठरणं ही सर्वात अवघड गोष्ट. पण तीच नेमकी साधल्यामुळं स्टायनरसारखी माणसं खलनायकाच्या रूपात येऊनही वाचकांच्या हृदयात नायकाचं स्थान मिळवून जातात.

या कादंबरीतली आणखीही काही पात्रं उल्लेखनीय अशीच वठली आहेत. नारफोकची जोना ग्रे वास्तविक जर्मनीची हेर. पण तिची व्यक्तिरेखादेखील अतिशय प्रभावी आहे असं नव्हे तर ती वाचकांची सहानुभूती खेचून घेणारी ठरेल.

आयरिश संघटनेचा सभासद डेव्हलिन यानं बजावलेली कामगिरी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आगळावेगळा ठसा उमटवून जाते. डेव्हलिनला वाचविण्यासाठी धडपडणारी गावंढळ मोली ही व्यक्तिरेखा अतिशय छोटी पण तितकीच बोलकी झाली आहे. फादरला फारसं महत्त्व नसलं तरी तो सहजासहजी स्मरणातून जाण्यासारखा नाही.

कादंबरीतला प्रत्येक प्रसंग चित्तथरारक अन् रोमांचकारी वाटतो. सर्व घटकांची मांडणी, जुळणी अन् त्याला मिळालेली अचूक शब्दांची जोड यामुळं कादंबरी विलक्षण मनोवेधक, मनोरंजक तितकीच प्रबोधकही झाली आहे. वाचताना प्रत्येक घटना प्रत्यक्षात घडते आहे असाच भास होतो, हे कादंबरीकाराचं सामर्थ्य. सत्य आणि असत्याची विलक्षण सांगड या कथानकात असल्यामुळं असत्यदेखील सत्य वाटू लागतं अन् कादंबरीचं इतिहासात रूपांतर होतं.

काही लघुकथा-स्वराज्यमधून वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या आणि काही बक्षीसपात्र ठरलेल्या, एक कादंबरी-'नियती' पैंजणमधून प्रसिद्ध झालेली आणि एक कीर्तन- १९६२ ते १९६९ या काळात ज्याचे अनेक ठिकाणी प्रयोग झाले; एवढ्या छोट्याशा शिदोरीवर लेखिकेनं ही कादंबरी अतिशय समर्थपणे स्वत:च्या आगळ्यावेगळ्या शैलीत लिहून जी 'गरुडझेप' घेतली आहे त्याचं कौतुक कोणत्या शब्दात करावं तेच कळत नाही. याचं स्वागत रसिक वाचक उत्स्फूर्तपणे करतील याविषयी मला खात्री आहे. लेखिकेकडून अशाच पण एकाहून एक सरस कादंबऱ्यांची अपेक्षा केल्यास ते वावगं ठरू नये.

डॉ. श्रीकांत व्ही. मुंदरगी
दत्तप्रसाद हॉस्पिटल
१०३९ ई, राजाराम रोड
कोल्हापूर.

✦✦✦

## एक

धुवाँधार पाऊस कोसळत होता. कोसळत्या पावसापासून बचाव करण्यासाठी मी माझ्या रेनकोटाची कॉलर वरती करून गळ्याभोवती नीट बसविण्याचा प्रयत्न केला. सकाळ असूनही सारं अस्पष्ट दिसत होतं. तसाच, समोरच्या स्मशानद्वारातून मी आत प्रवेश केला तेव्हा स्मशानाच्या एका कोपऱ्यातून खणण्याचा आवाज येत होता. आज इतक्या वर्षांनीही मला या साऱ्या बारीकसारीक गोष्टी आठवतात; कारण पुढे जे काही घडलं त्याचा पाया याच वेळी घातला गेला ना.

इतस्तत: पसरलेल्या थडग्यांमधून वाट काढीत त्या आवाजाच्या रोखाने मी जाऊ लागलो तोच बाजूच्या पिंपळाच्या झाडांमधून पाचसहा कावळे कलकलाट करीत पश्चिमेला उडत गेले. थडगं खणणारी व्यक्ती स्वत:शीच काही बोलत होती. अर्थात काय म्हणत होती हे मात्र समजत नव्हते. मी जवळ गेलो. नुकत्याच खणून काढलेल्या मातीचा ढीग एका बाजूला झाला होता. त्यावरती उभा राहून मी खाली त्या व्यक्तीकडे पाहिले. इतक्यात एक फावडं भरून माती त्याने फेकली. कसंबसं चुकवीत मी आत डोकावून पाहिले व त्याचे लक्ष वेधण्याइतपत मोठ्या आवाजात म्हटले, ''काय पाऊस कोसळतो आहे पाहा, जिकडे तिकडे रबडा झाला आहे. सकाळ झाल्याचेदेखील कळत नाही.''

आपल्या फावड्यावर टेकून त्याने वर पाहिले. तो एक वृद्ध होता. डोक्यावर कापडी टोपी, मातीने ओंगळभोंगळ बरबटलेला सूट त्याच्या अंगात होता. पाठीवर किलतानाचे कापड पांघरलेले होते. गालफडे बसलेली व दाढीचे पांढरे खुंट उगवलेले होते. डोक्यावरून खाली ओघळत गेलेला एक थेंब त्याच्या नाकाच्या टोकावर जाऊन विसावला व हळूच खाली ओघळला. डोळ्याच्या कोपऱ्यात पाणी साठलेले होते. दृष्टी शून्यमनस्क होती.

'पावसाबद्दल म्हणतोय मी', मी पुन्हा त्याला बोलतं करण्याचा प्रयत्न केला.

आता कोठे त्याच्या डोळ्यात माझं म्हणणं समजल्याचा भाव उमटला. आपली दाढी खाजवीत त्याने काळ्या ढगांनी कोंदटलेल्या आकाशाकडे पाहिले. 'फारच वाईट', नाकाला मुरड पाडीत तो म्हणाला.

खड्ड्यात एव्हाना पाचसहा इंच पाणी साठलेलं होतं. तिकडे पाहात मी म्हटलं, 'असल्या पावसात हे खड्डा करण्याचं काम फारच कठीण जात असेल नाही?'

'हं', नुसताच हुंकार देत त्याने आपलं फावडं खड्ड्याच्या बाजूवर मारताच बरीच माती कोसळली व त्याबरोबर काही सडके मानवी अवशेष पण पडले.

'फारच वाईट काम आहे. गेल्या काही वर्षांत या छोट्याशा स्मशानात किती माणसं गाडली आहेत पाहा. आता गाडण्यासाठी जागाच नाही. आता कोणालाही गाडायचं असेल तर पूर्वीच्या माणसांच्या अवशेषातच गाडावं लागेल.' तोंडाचं बोळकं दाखवित तो मोठ्यांदा हसला आणि खाली वाकून त्याने मानवी बोटाचे हाड उचलले अन् मला दाखवीत म्हणाला,

'पाहा, मी जे म्हटलं त्याचा हा पुरावा.'

असे नवीन विषय अथवा प्रसंग म्हणजे माझ्यासारख्या धंदेवाईक लेखकाला एक आव्हान होते. पण ज्यासाठी मी येथे येण्याचा खटाटोप केला त्याकरिता या आव्हानाला मर्यादा घालणे क्रमप्राप्त होते. म्हणून मी लगेच त्याला म्हटलं,

'मी अगदी योग्य ठिकाणी आलो आहेसं दिसतं. हे कॅथालिक चर्च आहे ना?'

'हो, सारे रोमन्स आहेत येथे' तो वृद्ध म्हणाला.

'हो का? मग मला एक छोटीशी मदत कराल का? मी एका थडग्याच्या शोधात आहे. किंवा चर्चमध्ये त्याचे काही स्मृतिविशेष असतील तरी चालतील. त्याचं नाव आहे गॅस्कोएन-चार्लस गॅस्कोएन, तो एका जहाजाचा कॅप्टन होता.'

'कधी ऐकलं नाही बाबा' तो खांदे उडवित म्हणाला, 'गेली चाळीस वर्षे या स्मशानात थडगी खणण्याचं काम करतोय. केव्हा गाडलं बरं त्याला?'

'साधारणपणे सोळाशे पंचाऐंशीच्या सुमारास' मी म्हटले.

तोंडावरचे भाव न बदलता तो म्हणाला, 'हां, हां, माझ्याही फार पूर्वी तर. मग फादर वेरकेर... हं, त्यांना कदाचित माहीत असेल तर पाहा.'

'आत चर्चमध्ये असतील का ते?' मी विचारले.

'चर्चमध्ये असतील अथवा प्रेसविटेरीमध्ये पाहा. त्या भिंतीच्या पल्याड, झाडांच्या बाजूला, तिथं पाहा.'

अचानक त्या वृक्षराजीतून काही कावळे उगाच कलकलाट करीत उडाले. त्या वृद्धाने वरती पाहिले, अन् ते बोटाचे हाड त्यांच्याकडे भिरकावले. 'काय कलकलाट मेल्यांचा!' तो ओरडला, 'अरे हाड, जा तिकडे लेनिनग्राडला.'

'लेनिनग्राडला! असं का म्हणालात?' गोंधळून मी विचारले.

तिकडूनच तर येतात हे कावळे. तिकडे त्यांना रिंगा घातल्या जातात आणि ऑक्टोबरमध्ये ते इकडे येतात. हिवाळ्यात काय मेली, गोठून टाकणारी थंडी हो तिथं.'

'हो का!' मी उगाच प्रतिसाद दिला.

आता मात्र त्या म्हाताऱ्याच्या अंगात थोडंसं चैतन्य आलं होतं. आपल्या कानामागची सिगारेट पेटवीत तो म्हणाला, 'एखादं माकडदेखील गोठून जाईल असली जीवघेणी थंडी तिथं. युद्धाच्या वेळी किती जर्मन सैनिक लेनिनग्राडमधे मेले... गोळ्यांनी नव्हे, गोठून मेले.'

मलाही गंमत वाटली. उत्सुकतेने मी विचारलं, 'कोणी सांगितलं तुम्हाला हे?'

'पक्ष्यांबद्दल म्हणता?' तो म्हणाला. तत्क्षणी त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. लबाडीची लहर त्याच्या डोळ्यात चमकली.

'कोण म्हणजे? वर्नरनी सांगितलं. त्याला पक्ष्यांबद्दल सगळं माहीत आहे.' तो म्हणाला.

'वर्नर कोण?' मी विचारले.

'वर्नर!' त्याच्या पापण्या फडफडल्या. सुस्कारा सोडला. आणि परत पूर्वीचे शून्यभाव तोंडावर आले. 'चांगला मुलगा होता. त्यांनी त्याला असं करायला नको होतं.' आणि खाली वाकून तो परत खणण्याचं काम करू लागला, जणू त्याला मला कटवायचं होतं. वर्नरबद्दल थोडी उत्सुकता माझ्या मनात निर्माण झाली तरी मी मुकाटपणे थडग्यांमधून वाट काढीत चर्चच्या मुख्य द्वाराजवळ आलो. वरती एका काळ्या लाकडी पाटीवर फिकुटलेल्या सोनेरी अक्षरात लिहिलं होतं–

संत मेरी व इतर संत यांचे चर्च. स्टडले कॉन्स्टेबल.

त्याखाली प्रार्थनेच्या वेळा होत्या. सर्वात खाली लिहिलं होतं –

फादर फिलिप वेरकेर, एस.जे.

जुनं ओकच्या लाकडाचं दार होतं. खूप लोखंडी पट्ट्या मारलेल्या होत्या. हँडलच्या जागी, तोंडात एक मोठी कडी असलेलं सिंहाचं तोंड होतं. दार उघडण्यासाठी ती कडी एका बाजूला वळवायला हवी होती. मी जेव्हा फिरवली तेव्हा विचित्र आवाज करीत दार उघडले गेले. बाह्य दर्शनी भागावरून आत अंधार असावा अशी माझी अपेक्षा होती; पण आत प्रकाशाचा झगमगाट दिसत होता. हॉल प्रशस्त होता. थोडक्यात ते एक मध्ययुगीन चर्चचे छोटेसे रूप वाटत होते. वरच्या लाकडी छतावर मानव व प्राणी यांच्या आकृत्यांचे अप्रतिम कोरीवकाम केलेलं होतं. छताच्या दोन्ही बाजूंना गोल खिडक्या होत्या. त्यातून स्वच्छ प्रकाश आत येत होता.

बाप्तिस्मा द्यावयाचा एक सुंदर दगड होता. त्याच्या जवळच्या भिंतीवर रंगवलेला बोर्ड होता. त्या चर्चमध्ये धर्मगुरूची कामे केलेल्यांची नावे लिहिण्यात आली होती. रॅफ द कोर्से ११३२ पासून सुरुवात होऊन शेवट वेरकेर यांच्या नावाने केलेला होता. १९४३ पासून ते तेथे धर्मगुरूचे काम करीत आहेत असा उल्लेख होता. त्याच्या पलीकडे मुख्य चर्चचा भाग होता. कुमारी मेरीच्या प्रतिमेपुढे मेणबत्त्या तेवत होत्या. प्रार्थनेसाठी मांडलेल्या बाकांच्या रंगांमधून पुढे गेलो. सगळीकडे शांत होतं. फक्त वरच्या खिडक्यांच्या तावदानावर पाऊस थडथडत होता. मुख्य वेदीवर क्रूसावर टांगलेली ख्राईस्टची मूर्ती होती.

माझ्या मागे पावले वाजली अन् शुष्कपणे धारदार आवाजात कोणीतरी विचारलं,

'काय हवं आहे आपल्याला?'

मी पटकन् वळून पाहिले. चर्चच्या दारात एक उंच, लुकडे असे धर्मगुरू उभे होते. त्यांच्या अंगावर विटक्या काळसर रंगाचा डगला होता. डोक्यावरच्या भुरक्या केसांचा भांग पडूच शकणार नाही इतके ते छोटे राखलेले होते. नुकतेच ते आजारातून उठले असावेत असे त्यांच्या खोल गेलेल्या डोळ्यांवरून वाटत होते. अन् गालफडावरच्या ओढल्या गेलेल्या कातडीवरून तर अधिकच जाणवत होते. चेहऱ्याची ठेवण वेगळीच होती. एकाच वेळी धर्मगुरूच्या ठिकाणचं विद्वत्तेचं तेज व सैनिकाची निर्भयता प्रतीत होत होती. अर्थात नोटिस बोर्डावर लिहिल्याप्रमाणे ते जेझुईट पंथाचे असल्याने या निश्चयाचं मला मुळीच आश्चर्य वाटलं नाही. त्यांच्या चेहऱ्यावरून मला हे प्रकर्षानं जाणवलं की कसलंतरी महाभयंकर दु:ख त्यांच्या हृदयात सलत असावं. हातातल्या काळ्या काठीवर रेलून डावा पाय ओढत ते पुढे येत होते.

'फादर वेरकेर?' मी विचारलं.

'हो, बरोबर आहे.' ते म्हणाले.

'बाहेर थडगं खणणाऱ्या वृद्धाशी बोलत होतो...'

'हं, हं. लॅकर आर्मस्बीशी.' फादर म्हणाले.

'हो, तोच असावा. तुम्ही मला मदत करू शकाल असं त्यानं सुचवलं.'

अन् पुढे होऊन हस्तांदोलनासाठी हात पुढे केला.

'मी, जॅक हिगीन्स. मी लेखक आहे.'

उजव्या हातातली काठी सावकाश डाव्या हातात घेऊन संथपणे त्यांनी आपला हात पुढे केला. त्यात त्यांची अनिच्छाच प्रतीत होत होती.